| MHK0050018822018 | **नियमित दिवाणी दावा क्र.१९८/२०१८ मधील नि.४० खालील आदेश** | श्री. भागोजी कल्लाप्पा डावरे<br>वि.<br>श्री. एकाप्पा हेगू धनगर |
|---|---|---|

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१अ व १ब यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा' चा आदेश रद्दबातल होऊन मिळेणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रस्तुत प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हा मयत झाला त्यावेळी वादीने चुकीचे नावे नमुद करुन त्यांचे वारसांना नोटीस काढली, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस मा. न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. प्रतिवादी क्र. १अ व १ब यांनी जाणूनबूजून हजर राहिले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १अ व १ब यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती प्रतिवादी क्र. १अ व १ब यांनी केलेली आहे. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दाव्यास विलंब होण्याकरीता जाणूनबूजून विलंब केला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**४.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. अवलोकनार्थ असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१अ व १ब यांना नोटीस लागू झाल्याचे दिसून येते. प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रस्तूतचा अर्ज हा दि.०३/०८/२०२३ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दाखल करणेस प्रतिवादी क्र. १अ व १ब यांना काहीच कालावधी झालेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १अ व १ब यांच्या विरुध्द दि.०७/०७/२०२३ रोजी एकतर्फा आदेश झालेला आहे. जर एकतर्फा आदेश बाजूला सारुन प्रतिवादी क्र.१अ व १ब यांना हजर करुन घेतले तर याचा वादीवर कोणताही परिणाम होणार नाही. प्रस्तुत प्रतिवादी क्र १अ व १ब यांचा एकतर्फा आदेश रद्द केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट

त्यामुळे प्रस्तुत वादी यांना त्यांचा बचाव करणेची संधी मिळेल. तसेच प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल देणे न्यायालयास शक्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

सही/-

**दिनांक- २७/११/२०२३**
**इचलकरंजी.**

**(संजय दि.वानखेडे)**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**